**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३१२९ दिनांक २९/०९/२०१९**

**खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**"जिल्हा हिंगोली येथील खुनाच्या गुन्हयातील फरारी आरोपी पकडलेबाबत."**

आज दि. २८/०९/२०१९ रोजी पोलीस उप निरीक्षक श्री अमोल भोसले पो. हवा. ८३० मोमीन पो.शि. ८३२५ लोणकर यांचे पथकाने पाटील इस्टेट भागात दुपारी १२/४५ वा. चे सुमारास गस्त घालत असताना स्टेट बँक ए. डी. एम. वाकडेवाडी पुणे येथे एक इसम अचानकपणे त्यांना पाहुन पळुन जावु लागला. त्यावरुन त्यांना त्याचा संशय आल्याने त्यास त्यांनी पाठलाग करुन पी. एम. सी. कॉलनीजवळ त्यास ताब्यात घेतले व त्यास त्याचा नाव पत्ता विचारता तो घाबरलेल्या स्थितीत असल्याने काहीही माहिती देत नसल्याने त्यास खडकी पोलीस ठाणेस आणले व आमचे समक्ष हजर केले. आम्ही त्याचेकडे विश्वासात घेवुन चौकशी केली असता त्याने त्याचे नाव माधव तुकाराम टोमके वय २९ वर्षे रा. मु. पो. माळवटा ता. वसमत जि. हिंगोली असे असल्याचे सांगीतले. त्यास विश्वासात घेवुन अधिक चौकशी केली असता त्याने सांगितले की, दि. २४ – २५/०८/२०१९ रोजी सायंकाळी ०४/०० ते ०४/३० वा. चे सुमारास मी व माझा नातेवाईक नामे मधुकर ऊर्फ पांडुरंग ज्ञानेश्वर जाधव वय ४५ वर्षे रा. टाकळखोपा याचेबरोबर दारु पित बसलो असता त्यांचेत व माझेत भांडण होवुन भांडणादरम्यान त्यास मी दगडाने मारहाण केल्याने तो गंभिर जखमी झाल्याचे पाहुन मी तेथुन पळुन गेलो. नंतर मला तो मयत झाल्याचे समजल्याने पोलीस मला पकडतील या भितीने मी पोलीसांपासुन वाचण्यासाठी पळत आहे असे सांगितले. त्याने दिलेली माहिती खरी आहे अगर कसे याची पोलीस उप निरीक्षक श्री भोसले यांनी हट्टा पोलीस स्टेशन जि. हिंगोली येथे संपर्क नंबर ०२४५६/२४४०१० यावर फोन करुन सदर माहितीचे अनुषंगाने खात्री केली असता त्याबाबत हट्टा पोलीस स्टेशन गु. र. नं. २६२/२०१९ भा.दं.वि.क. ३०२ प्रमाणे दि. २८/०८/२०१९ रोजी गुन्हा दाखल असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सदर गुन्हयात नमुद इसम हा आरोपी असुन तो त्यांचे गुन्हयातील पाहिजे आरोपी असल्याचे सांगितले. त्यावर आम्ही त्यांस नमुद आरोपीस खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर येथे संशयावरुन ताब्यात घेतले असल्याचे कळवीले. तसेच नमुद आरोपीचा ताबा घेणेबाबत संबंधीत पोलीस ठाणेचे अधिकारी सपोनि श्री वाघमारे, हट्टा पोलीस स्टेशन, हिंगोली ग्रामीण यांना कळवीणेत आले. त्यानुसार नमुद आरोपीचा संबंधी पोलीस ठाणेचे पोलीसांनी २९/०९/२०१९ रोजी ताबा घेतला आहे.

सदर उत्कृष्ठ कामगीरी पोलीस उप निरीक्षक श्री अमोल भोसले पो. हवा. ८३० मोमीन पो.शि. ८३२५ लोणकर यांनी केली आहे.

**( भागवत मिसाळ )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडकी पोलीस स्टेशन, पुणे.